शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
**परिपत्रक**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये व परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासूनच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, निरंतर संलग्नीकरणाचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून शैक्षणिक वर्ष 2023-24 पासूनच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, निरंतर संलग्नीकरण इ. बाबचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने सादर करण्याकरिता मार्गदर्शन करण्यासाठी दि. 13 जुलै, 2022 रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2023-24 पासूनच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, निरंतर संलग्नीकरण इ. प्रस्तावांचे नमुने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. 18/07/2022 पासून उपलब्ध करून देण्यात येणार असून महाविद्यालयांनी त्यांना लागू असणारे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने भरावेत. तसेच, सदरचे प्रस्ताव सादर करण्याबाबतचे परिपत्रक लवकरच प्रसिध्द करण्यात येत आहे.

ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याबाबत काही अडचणी आल्यास याबाबत support.cc@unishivaji.ac.in या ईमेल आयडी वर मेल करावा.

कोणत्याही परिस्थितीमध्ये ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

प्रत- संगणक केंद्रास

संदर्भ क्र. - संलग्नता/टी-२/ № 00102
दिनांक - 16 JUL 2022